## वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६८ /२०२४ — दि. ०५ /०९/२०२४

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. सदर कालावधीत रायलादेवी मॉडेला चेकनाका, वागळे इस्टेट, ठाणे येथे विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) वागळे इस्टेट, रोड नं. १६ कडून महाराष्ट्र बॅंक पासून जिलानीवाडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (गणपती मूर्ती असलेली वाहने वगळून) **महाराष्ट्र बॅंक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने रोड नं. १६ कडून सरळ मॉडेला चेकनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) रघुनाथ नगर, हाजुरी कडून संकल्प चौक येथून महाराष्ट्र बॅंक – जिलानीवाडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (गणपती मूर्ती असलेली वाहने वगळून) **संकल्प चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने संकल्प चौकातून रहेजा कट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग झोन –** अ) रोड नं. १६ ते मॉडेला चेकनाका दरम्यान संपूर्ण रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **'नो पार्किंग झोन'** करण्यात येत आहे.
ब) महाराष्ट्र बॅंक (जुना पासपोर्ट ऑफिस) कडून जिलानीवाडी – संकल्प चौक दरम्यान संपूर्ण रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **'नो पार्किंग झोन'** करण्यात येत आहे.
क) मॉडेला चेकनाका ते **MSEB** ऑफिस पर्यंत तीन हात नाका कडे जाणाऱ्या रस्त्याचे एका बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **'नो पार्किंग झोन'** करण्यात येत आहे.

**वन वे –** रोड नं. १६ कडून मॉडेला चेकनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (गणपती मूर्ती असलेली वाहने वगळून) **महाराष्ट्र बॅंक (जुना पासपोर्ट)** येथे **'वन वे'** करण्यात येत आहे. सदर वाहने मॉडेला चेकनाका कडून रोड नं. १६ कडे जाणाऱ्या वाहिनीवरील तीन लेन पैकी एका लेनवरून जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner